**महत्वाचे परिपत्रक**

जा.क्र..सीपीएस/कीना.दर/२०१२-१३/१२६/गुनि-५/२०१२
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे — ४११००१
दिनांक- २५ मे २०१२

प्रति,

१.विभागीय कृषि सहसंचालक -------------------------- (सर्व)

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ----------------- (सर्व)

३. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी ----------------------- (सर्व)

४. कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद ----------------- (सर्व)

विषयः सन २०१२-१३ करीता विविध केंद्र/राज्य योजनांतर्गत अनुदानावर पुरवठयासाठी रासायनीक कीडनाशकांचे दराबाबत...

संदर्भ : १) शासन निर्णय क्रं पीकरक्षा १०७९/६६११४/सीआर-६२६/५ए, दि. ९ मे १९८०
२) शासन निर्णय क्रं सीपीएस/१२८३/३७३८६/सीआर१२५/५ए, दि. १६ ऑगस्ट १९८३
३) शासन निर्णय क्रं सीपीएस/१०९२/४१४१/केंनं २१५/७ए, दि. १७ जुलै १९९३
४) आयुक्तालयस्तरावरील दर निश्चिती समितीची सभा दि. १५/५/२०१२

**पार्श्र्वभूमी**

राज्यात विविध केंद्र/राज्य पुरस्कृत योजनेंतर्गत राबविण्यात येणा-या पीक संरक्षण मोहिमांसाठी अनुदानावर पुरविण्यात येणा-या पीक संरक्षण औषधांच्या पुरवठयासाठी शासनाने महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ व महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ यांची शासन पुरवठा संस्था म्हणून नियुक्ती केली आहे. शासन निर्णय क्रं.सीपीएस/१०९२/४१४१/कें.नं.२१५/७-ए, दि. १७ जुलै १९९३ नुसार जी कीडनाशके महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ स्वत: उत्पादीत करते त्यांचा योजनांतर्गत पुरवठा त्यांचेकडून करण्याचे शासनाचे धोरण आहे.

१.सन २०१२-१३ साठी कीडनाशकांचे दरः

सन २०१२-१३ मध्ये राज्यात विविध केंद्र/राज्य पुरस्कृत योजनेंतर्गत राबविण्यात येणा-या पीक संरक्षण मोहिमांसाठी महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ व महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ यांचेमार्फत पुरविण्यात येणा-या पीक संरक्षण औषधांचे पॅकींग साईजनिहाय दर सोबत सहपत्रित केले आहेत. सदर दर हे औषधांचा तालुकास्तरापर्यंत पुरवठा करण्यासाठीचे आहेत. शासकीय योजनांखालील पुरवठयाचे दर खुल्या बाजारातील त्याच दर्जाच्या औषधांच्या दरापेक्षा जास्त राहणार नाहीत याची खात्री करण्याच्यादृष्टीने खुल्या बाजारातील दरांची चौकशी करावी. आवश्यकतेनुरुप सर्व तपशीलासह त्याबाबतचा अहवाल आयुक्तालयास पाठवावा, जेणेकरुन पुढील निर्णय घेणे सुलभ होईल. औषधांच्या तांत्रिक नावाने दरपत्रकात दर दर्शविण्यात आले आहेत. जी औषधे आय.एस.आय. मार्क आहेत, त्यांचे समोर आयएसआय मार्क असे नमूद केले आहे. त्याबाबत आपणास पुरविण्यात आलेली औषधे आय.एस.आय. मार्कची आहेत, याची खात्री करुन घ्यावी. ज्या नॉन आय.एस.आय. दर्जाच्या औषधांचे पुरवठयास मान्यता दिली आहे, त्याबाबत दर्जाची हमी पुरवठा संस्थेची राहील. मात्र, अशा औषधांच्या नमुन्यांची तपासणी आय.एस.आय. मानकांनुसारच करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

१.१ सन २०१२-१३ करीता रासायनिक कीटकनाशकांचे दर निश्चित करण्यात आले असून ते या परीपत्रकासोबत सहपत्रीत करण्यात आले आहेत. सदर दर हे सन २०१२-१३ करिता दर लागू राहतील.

**२. कीडनाशकांची मागणी नोंदविणे प्रक्रीया :**

सोबतच्या दर पत्रकात दर्शविलेल्या कीटकनाशके, बुरशीनाशके व तणनाशके यांची मागणी व पुरवठयाचे दृष्टीने खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

२.१ः दर पत्रकातील (अ) अ.क्र. १ ते ५ वरील कीटकनाशके, बुरशीनाशके व तणनाशके यांचे उत्पादन महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळामार्फत करण्यात येत असल्याने संदर्भीय दि.१७ जुलै १९९३ च्या शासन निर्णयानुसार त्यांचा पुरवठा केवळ महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळामार्फत करण्यात येईल. त्यामुळे सदर कीटकनाशके, बुरशीनाशके व तणनाशके यांची मागणी महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळाकडे नोंदवावी. तसेच, दर पत्रकातील (ब) अ.क्र. ६ वरील कीटकनाशके, बुरशीनाशके व तणनाशके यांचा पुरवठा केवळ महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळामार्फत करण्यात येईल. त्यामुळे त्यांची मागणी महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळाकडे नोंदवावी.

२.२ः दर पत्रकातील (क) अ.क्र. ७ वरील कीडनाशके यांचा पुरवठा केवळ महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ यांचेमार्फत करण्यात येईल. त्यामुळे त्यांची मागणी महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ या पुरवठा संस्थेकडे नोंदविता येईल. तथापी, मागणी नोंदविण्यापूर्वी पुरवठा संस्थेकडे मागणी केलेल्या कीडनाशकांचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याची व वेळेवर पुरवठा होईल याची खात्री करुन संबंधीत पुरवठा संस्थेकडे मागणी नोंदवावी.

२.३ः शासकीय योजनेतंर्गत औषधांचा पुरवठा हा तांत्रिक नावानेच करण्यात येत असल्याने विशिष्ट_ब्रॅण्डच्या औषध पुरवठयासाठी पुरवठा संस्थेकडे कोणत्याही परिस्थितीत आग्रह धरु नये.

२.४ः विविध योजनांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आपल्या जिल्हयासाठी मंजूर आर्थिक/भौतीक लक्षांकाप्रमाणे व कीड व रोगाच्या प्रादुर्भावाचे प्रमाणानुसार केंद्रीय कीटकनाशक मंडळाचे मंजूर लेबल क्लेम्स व पीक संरक्षण शिफारस पुुस्तिकेत शिफारस केलेल्या मात्रेप्रमाणे संबंधीत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी/कृषि विकास अधिकारी यांनी आपल्या जिल्ह्याची पीक संरक्षण औषधांची मागणी विभागीय कृषि सहसंचालक यांचेमार्फत संबंधीत पुरवठा संस्थांकडे नोंदविण्यात यावी. त्यासोबत तालुकानिहाय औषध पुरवठयाचा सविस्तर तपशिल पुरवठा संस्थेच्या जिल्हा/विभागीय कार्यालयास कळवावा. जेणेकरुन नियोजनबध्द व वक्तशीर पुरवठा करणे शक्य होईल. कोणत्याही परिस्थितीमध्ये मंजूर आर्थिक/भौतीक कार्यक्रमापेक्षा जास्त मागणी, शिफारस न केलेल्या औषधांची मागणी पुरवठा संस्थाकडे नोंदविण्यात येऊ नये. अतिरिक्त मागणी नोंदवून साठा शिल्लक राहील्यास, त्यास संबधित मागणी नोंदविणा-या अधिका-यास जबाबदार धरले जाईल याची नोंद घ्यावी.

२.५ः तणनाशके, पिकासाठी अती संवेदनशील असल्याने त्यांचा वापर करताना लेबल क्लेमवर नमुद असलेल्या वापरा बाबतच्या सुचनाप्रमाणे तणनाशकांचा वापर करण्याची दक्षता घेण्यात यावी. तणनाशकांचा वापर करताना स्प्रेपंपाची स्वच्छता व योग्य प्रकारच्या नोझलचा वापर करण्याच्या सुचना सर्व संबंधितांना देण्यात याव्यात जेणेकरुन पिकाचे नुकसान होणार नाही.

२.६ : मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी जनहीत याचिका क्र. २१३/२०११ च्या अनुषंगाने दिनांक १३/५/२०११ रोजी दिलेल्या अंतरीम आदेशास अनुसरून केंद्र शासनाचे इंग्रजी पत्र क्र. १३०३३/६/२०१११ पीपीआय, दिनांक १४/५/२०११ अन्वये एन्डोसल्फान या कीटकनाशकाच्या उत्पादन, विक्री व वापरावर पुढील आदेश होईपर्यंत बंदी घातली आहे. त्यामुळे एन्डोसल्फानचे दर निश्चित केले नाहीत, तरी पुढील आदेश होईपर्यंत एन्डोसल्फान या कीटकनाशकाची मागणी, पुरवठा व वापर करण्यात येवू नये. याबाबत आयुक्तालयाचे परिपत्रक क्र.१७३/२०११, दिनांक २ जून २०११ नुसार सर्व संबंधितांना कळविण्यात आले आहे.

३. कीडनाशकांची गुणवत्ता तपासणी :

शासकीय योजनांतर्गत पुरविण्यात येणा-या औषधांच्या दर्जाबाबत खात्री करण्याच्या दृष्टीने आपल्या जिल्ह्यात पुरविण्यात येणा-या कीडनाशकांच्या प्रत्येक बॅचचा किमान एक तरी नमुना पूर्णवेळ /अर्धवेळ निरिक्षकामार्फत गोदामस्तरावर साठा उपलब्ध झाल्याबरोबर तात्काळ काढल्यास एकाच बॅचचे अनेकदा नमुने काढण्याचे टाळता येईल व पर्यायाने प्रयोगशाळांवरील कामाचा भार सुध्दा काही प्रमाणात कमी करता येईल. सदर नमूने तात्काळ आपल्या जिल्हयाशी संलग्न कीटकनाशक चाचणी प्रयोगशाळेकडे विश्लेषणासाठी पाठवावेत. शासकीय मोहीमांतर्गत पुरवठयाखालील नमुने कीटकनाशक प्रयोगशाळेत तपासणीस पाठविताना नमूना चिठ्ठीवर “मोहिमांतर्गत__नमुना” असे सुस्पष्ट लिहावे. जेणे करुन प्रयोगशाळेत प्राधान्याने तपासणी करणे साईचे होईल. प्रयोगशाळेत विश्लेषणात नमूना अप्रमाणित घोषित झाल्यास संबंधीत निरिक्षकाने त्याबाबत तात्काळ पुरवठा संस्थेस व सर्व संबधीतास लेखी कळवावे, अहवालाची प्रत द्यावी, तसेच अशा बॅचच्या कीडनाशकांचा पुरवठा होणार नाही हे पहावे. नमूना अप्रमाणित घोषित झालेल्या कीडनाशकांच्या संपूर्ण बॅचचे देयक अदा करण्यात येऊ नये, यदाकदाचीत देयक अदा केले असल्यास देय ठरणा-या रकमेतून सदर रक्कम वसूल करावी ही जबाबदारी मागणी नोंदविणा-या अधिका-याची राहील.

४. देयकांची अदायगी :

ज्या योजनेखालील औषधांची मागणी नोंदविली आहे, त्या योजनेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार लाभधारकांची निवड करणे व अनुदान मर्यादा देय राहील. सन २००८-०९ पासून पीक संरक्षण मोहिमांतर्गत पुस्तकी समायोजनेची कार्यपध्दती बंद करण्यात आली आहे. याबाबत यापूर्वी कृषि संचालक (वि. व प्र.) यांच्याकडून सविस्तर मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे कीडनाशकांचे लाभार्थीना वाटप करताना लाभधारकांकडून अनुदान वजाजाता रोख वसूल करण्यात येणारी लोकवाटयाची रक्कम संबंधीतांनी १५ दिवसात जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी/कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांचेकडे जमा करावी. लोकवाटयाची रक्कम कोणत्याही परिस्थीतीत चलनाद्वारे शासकीय कोषागारात भरणा करण्यात येवू नये. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी / कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांनी सदर रक्कम ३० दिवसात पुरवठा संस्थेस अदा करावी. सदर रक्कम वेळेवर भरणा न केल्यास शासकीय रकमेचा अपहार या सदराखाली संबंधितांविरुध्द तात्काळ कार्यवाही करावी. याबाबीचे संनियंत्रण करण्याची सर्वस्वी जबाबदारी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी/कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांची राहील. योजनांतर्गत अनुदानाची रक्कम परस्पर पुरवठा संस्थेस वेळेवर अदा करावी. देयकांचे अदायगीस विनाकारण विलंब झाल्यास त्यास संबधीत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी/कृषि विकास अधिकारी, यांना जबाबदार धरण्यात येईल.

सहपत्र-दरांचा तक्ता

स्वाक्षरीत/-
कृषि संचालक (नि.व.गु.नि.)
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११००१

**प्रत :-**

१) मा.प्रधान सचिव, कृषि, कृषि व पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभाग, मत्सव्यवसाय विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

२) मा. आयुक्त कृषि, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - 1 यांना माहितीस्तव सविनय सादर.

३) मा. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ, आरे मिल्क कॉलनी, दिनकरराव देसाई मार्ग, गोरेगाव (पूर्व) मुंबई -६५ यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव सादर.

आपणांस विनंती की, वेळोवेळी कळविण्यात येणा-या जिल्हानिहाय पुरवठा कार्यक्रमाप्रमाणे कीडनाशकांचा वक्तशीर पुरवठा गटपातळीपर्यंत करण्याची कृपया व्यवस्था करावी. आपणाकडून पुरविण्यात येणा-या कीडनाशकांच्या दर्जाबाबत खात्री करुनच पुरवठा करावा.

४) मा. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, कनमूर हाऊ स, नरसीनाथा स्ट्रीट, मस्जीद बंदर, (प.) मुंबई - ९ यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव सादर.

आपणांस विनंती की, वेळोवेळी कळविण्यात येणा-या जिल्हानिहाय पुरवठा कार्यक्रमाप्रमाणे कीडनाशकांचा वक्तशीर पुरवठा गटपातळीपर्यंत करण्याची कृपया व्यवस्था करावी. आपणाकडून पुरविण्यात येणा-या कीडनाशकांच्या दर्जाबाबत खात्री करुनच पुरवठा करावा.

५) कृषि संचालक, (विस्तार व प्रशिक्षण)/कृषि संचालक (फलोत्पादन) यांना समादराने माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित. विविध योजनांतर्गत अनुदानाच्या दरांची मर्यादा ठरविण्याची कार्यवाही कृपया आपल्यास्तरावरुन तात्काळ करावी.

६) विभागीय कृषि सहसंचालक(सर्व) यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव रवाना. जिल्हानिहाय मंजूर कार्यक्रमाप्रमाणे प्रत्येक कार्यक्रमासाठी जिल्हानिहाय, मोहीमनिहाय कीडनाशकांची मागणी तांत्रीकदृष्टया तपासून पुरवठा संस्थेकडे तात्काळ कळवावी.

७) मुख्य गुणवत्ता नियंत्रण अधिकारी, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

८) कृषि उपसंचालक-पीक संरक्षण, गळितधान्य/कडधान्य, नगदी पीके, तृणधान्ये, नियोजन, फलोत्पादन,

स्वाक्षरीत/-
कृषि संचालक (नि.व.गु.नि.)
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११००१

सन २०१२-१३ मध्ये विविध पीक संरक्षण मोहिमांतर्गत पुरविण्यात येणा-या
कीडनाशकांचे पॅकीगनिहाय दर दर्शविणारा तक्ता

अ) महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ स्वतः उत्पादीत कीडनाशके, बुरशीनाशके, तणनाशके

| क्र . | औषधाचे नाव | पॅकींग साईज | २०१२-१३ साठी ठरविण्यात आलेले दर प्रति युनिट (रुपये) |
|---|---|---|---|
| 1 | २ | ३ | ४ |
| 1 | कार्बनडायझीम ५० डब्लू. पी. (आयएसआय) | १०० ग्रॅम | ४७.०० |
| | | २५० ग्रॅम | १०५.०० |
| | | ५०० ग्रॅम | २००.०० |
| | | १ किलो | ३९०.०० |
| २ | मॅन्कोझेब ७५ डब्लू.पी. (नॉन आयएसआय) | ५०० ग्रॅम | १५६.०० |
| ३ | मेटॅलॅक्झिल एम -झेंड ७२ डब्ल्यु. पी. (नॉन आयएसआय) | २५० ग्रॅम | २२९.०० |
| | | ५०० ग्रॅम | ४२४.०० |
| ४ | सी.ओ.सी.५० टक्के डब्ल्यु. पी. (आयएसआय) | ५०० ग्रॅम | २२०.०० |
| ५. | मोनोक्रोटोफॉस ३६ टक्के इ.सी. (नॉन आयएसआय मार्क) | २५० मि.ली. | १०८.०० |
| | | ५०० मि.ली. | २०४.०० |
| | | १ लिटर | ३८९.०० |
| ब) महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळाद्वारे पुरवठा केली जाणारे कीडनाशके, बुरशीनाशके, तणनाशके | | | |
| ६ | इमॅझिथॅपर १० एसएल (नॉन आयएसआय) | १ लिटर | १७८०.०० |
| क) महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ यांचेमार्पत पुरवठा करण्यात येणारी कीडनाशके, बुरशीनाशके, तणनाशके | | | |
| ७ | एन.ए.ए. ४.५ टक्के एस.एल. (नॉन आयएसआय) | १०० मिली | ५०.०० |
| | | २५० मिली | १२१.०० |
| | | ५०० मिली | २३४.०० |

स्वाक्षरीत/-
कृषि संचालक (नि.व.गु.नि.)
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११००१

**तातडीचे पत्र**

जा.क्र.सीपीएस/राकिदर/२०१२-१३/१२९/गुनि-५/२०१२
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१
दिनांक - २९ मे २०१२

प्रति,

१.विभागीय कृषि सहसंचालक -----------------------------------(सर्व)
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,------------------------(सर्व)
३. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी --------------------------------(सर्व)
४. कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद -------------------------(सर्व)

विषय : सन २०१२-१३ करिता विविध केंद्र/राज्य पुरस्कृत योजनांतर्गत पुरवठा करण्यात येणा-या रासायनीक कीटकनाशकाचे दराबाबत....

संदर्भ : आयुक्तालयाचे परिपत्रक क्र.सीपीएस/किनादर/२०१२-१३/१२६/गु.नि-५/२०१२, दि.२५ मे २०१२

सन २०१२-१३ करिता विविध केंद्र/राज्य पुरस्कृत योजनांतर्गत अनुदानावर पुरविण्यात येणा-या कीटकनाशकांचे / तणनाशकांचे दर संदर्भिय परिपत्रक दि. २५ मे २०१२, चे सोबत सहपत्रीत करुन सर्व संबंधितांना कळविण्यात आले आहेत. खालील रासायनीक कीटकनाशकांचे दर निश्चित करण्यात आले असून ते पुढील कार्यवाहीसाठी कळविण्यात येत आहे.

| **१.** महाराष्ट्र राज्य कृषि उद्योग विकास महामंडळ यांचे मार्फत पुरवठा करण्यात येणारी कीटकनाशके (स्वत: उत्पादीत) | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | कीटकनाशकाचे नाव | पॅकींगसाईज (मिली/लि.) | सन २०१२-१३ साठी ठरविण्यात आलेले दर (रूपये) |
| 1 | हेक्झाकोनेझॉल ५टक्के ई.सी. (नॉन आयएसआय) | ५०० मि.ली. | १४९.०० |
| | | १ लिटर | २६८.०० |
| २ | फेनव्हलरेट २० टक्के ई.सी. (नॉन आयएसआय) | २५० मि.ली. | ८४.०० |
| | | ५०० मि.ली. | १५७.०० |
| | | १ लिटर | २८३.०० |
| ३ | डायमेथोएट ३० टक्के ई.सी. (आयएसआय मार्क) | २५० मि.ली. | ८९.०० |
| | | ५०० मि.ली. | १५३.०० |
| | | १ लिटर | २८५.०० |
| ४ | अल्फामेथ्रीन १० टक्के ई.सी. (नॉन आयएसआय) | २५० मि.ली. | ६४.०० |
| | | ५०० मि.ली. | ११७.०० |
| | | १ लिटर | २२९.०० |
| ५ | क्विनॉलफॉस २५ टक्के ई.सी. (आयएसआय मार्क) | २५० मि.ली. | ९४.०० |
| | | ५०० मि.ली. | १६५.०० |
| | | १ लिटर | ३१९.०० |
| ६ | मेलॅथिऑन ५० टक्के ई.सी. (आयएसआय मार्क) | ५०० मि.ली. | १२९.०० |
| | | १ लिटर | २५०.०० |
| ७ | ईमीडॅक्लोप्रिड १७.८ टक्के ई.सी. (नॉन आयएसआय) | ५० मि.ली. | ५६.०० |
| | | १०० मि.ली. | १०२.०० |
| | | २५० मि.ली. | २३०.०० |
| | | ५०० मि.ली. | ४५०.०० |

| अ. क्र. | कीटकनाशकाचे नाव | पॅकींगसाईज (मिली/लि.) | सन २०१२-१३ साठी ठरविण्यात आलेले दर (रूपये) |
|---|---|---|---|
| ८ | ऍसिटॅमिप्रिड २० टक्के एस.पी. (नॉन आयएसआय) | ५० मि.ली. | ६२.०० |
| | | १०० मि.ली. | ११८.०० |
| | | २५० मि.ली. | २७३.०० |
| २. महाराष्ट्र राज्य कृषि उद्योग विकास महामंडळ यांचेमार्फत पुरवठा करण्यात येणारी कीटकनाशके (स्वत: उत्पादीत करीत नसलेली) | | | |
| ९ | फोरेट १० जी (आयएसआय मार्क) | १ किलो | ६१.०० |
| १० | ऍसिफेट ७५ टक्के डब्ल्युपी (नॉन आयएसआय) | ५०० ग्रॅम | २१७.०० |
| | | १ किलो | ४२४.०० |
| ११ | सल्फर ८० टक्के डब्ल्युपी (नॉन आयएसआय) | ५०० ग्रॅम | ३८.०० |
| १२ | स्ट्रेप्टोसायक्लीन (आयएसआय मार्क) | ६ ग्रॅम | ३२.०० |
| १३ | ट्रायझोफॉस ४० इसी (नॉन आयएसआय) | २५० मिली | १११.०० |
| | | ५०० मिली | २१५.०० |
| | | १ लीटर | ४१०.०० |
| १४ | ऍरिओफंगीन ४६.१५ टक्के एसपी (आयएसआय मार्क) | १३ ग्रॅम | १८४.०० |
| १५ | २-४ डी सोडियम सॉल्ट (नॉन आयएसआय) | ५०० ग्रॅम | १३५.०० |
| १६ | पॅराक्वेट डायक्लोराईड २३ टक्के एसएल (नॉन आयएसआय) | ५०० मिली | १४०.०० |
| | | १ लिटर | २७०.०० |

वरील रासायनीक कीटकनाशकांचा पुरवठा महाराष्ट्र राज्य कृषि उद्योग विकास महामंडळ यांचेमार्फत करण्यात येईल. त्यामुळे त्यांची मागणी महाराष्ट्र राज्य कृषि उद्योग विकास महामंडळ यांचेकडे नोंदवावी. याबाबत पुढील कार्यवाहीसाठी आयुक्तालयाच्या संदर्भिय परिपत्रक दि. २५ मे २०१२ नुसार दिलेल्या सुचना जशाच्या तशा लागू राहतील, याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरीत/-

कृषि संचालक (नि. व गु.नि.)

कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य. पुणे -१

प्रत :

१. मा. प्रधान सचिव, कृषि, कषि व सहकार विभाग, मंत्रालय, मुंबई -३२ यांना माहितीसाठी सविनय सादर

२. मा. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि उद्योग विकास महामंडळ, आरे मिल्क कॉलनी,दिनकरराव देसाई मार्ग, गोरेगाव (पूर्व), मुंबई — ४०००६७, यांना माहिती तथा पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर